


दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
९४०३६ ४१४८२
राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | शुक्रवार १ नोव्हेंबर २०२४ | अंक ३२६ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु


# मनोज जरांगे पाटील यांनी आता जातीय समीकरण केलं फिट, M फॅक्टर काय?

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, एका जातीवर कोणीही जिंकत नाही, मराठा असो वा कुणीही. राजकारण सोपे नाही. राजकीय प्रवासासाठी सगळ्या जातीधर्मांशिवाय पर्याय नाही. फूट पाडायचा प्रयत्न होता, शेवटच्या टप्प्यात आम्ही एकत्र आलो. आरक्षण देत नाही. मराठा नको, केवळ मराठा मतदानापुरता हवाय. कारखाने, शाळा सगळे या लोकांचे आहेत. नेता नको, पक्ष नको, आम्ही कुणाला मोठे करणार नाही. असं ही जरांगे म्हणाले.



मनोज जरांगे पाटील यांनी आता जातीय समीकरण फिट केलंय. मराठा, मुस्लीम आणि दलित या समीकरणातून आता सत्ताधाऱ्यांना पाडून जिंकणार, असं जरांगेंनी म्हटलंय. अंतरवाली सराटीत मुस्लीम आणि बौद्ध धर्मगुरुंसोबत जरांगेंची बैठक झाली आणि या बैठकीत मराठा, मुस्लीम आणि दलित असं समीकरण सेट करण्यात आलं. एक एका मतदारसंघात 4-5 अर्ज भरण्याचं आवाहन आधीच जरांगेंनी केलं होतं. आता कोणाचा अर्ज ठेवायचा आणि कोणाचे अर्ज काढायचे हे मराठा, मुस्लीम आणि दलित समीकरणावरुन ठरवलं जाणार असून 3 तारखेला घोषणा होणार आहे. जरांगेंचा अधिक जोर हा मराठवाड्यात आहे आणि मराठवाड्यात 48 विधानसभेच्या जागा आहेत. स्वाभाविक आहे, जरांगेंच्या निशाण्यावर भाजपचेचे उमेदवार मोठ्या प्रमाणात असतील. तसा डाव राखून ठेवल्याचंही जरांगे सांगत आहेत. मराठा आरक्षणाचा मुद्दा असला तरी, एकट्या मराठ्यांच्या जोरावर सत्ताधाऱ्यांना पराभूत करता येत नाही, हे जरांगेंना चांगलं माहिती होतं. आणि जरांगे फक्त मराठाच नाही तर मुस्लीम आरक्षणाचीही मागणी करत आहेत. त्यातूनच मराठा, मुस्लीम आणि दलित कॉम्बिनेशन जरांगेंनी तयार केलंय. अर्थात या M आणि D फॅक्टरचा परिणाम 23 नोव्हेंबरला दिसेल.

## उमेदवारी माघार घेण्यासाठी स्वत: अर्ज सादर करा - गौरव इंगोले

बीड दि. 31 : माजलगाव विधानसभा मतदारसंघासाठी नामनिर्दिष्ट उमेदवारांनी उमेदवारी माघार घेण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज दिनांक ३१ ऑक्टोबर रोजी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, तहसील कार्यालय, माजलगाव येथे सकाळी ९.४५ ते ५.४५ वाजता व दिनांक ०४ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी तीन वाजेपर्यंत स्वत: हजर होऊन सादर करावेत. दिनांक ०१ नोव्हेंबर २०२४ ते ०३ नोव्हेंबर २०२४ या तिन्ही दिवशी शासकीय सुटी असल्याने कार्यालयास उमेदवारी माघार घेण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज सादर करता येणार नाही. तसेच दिनांक ०४ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी ३ वाजेनंतर चिन्ह वाटप करण्याची सुरूवात होईल, चिन्ह वाटपाची प्रक्रिया भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसारच चिन्ह वाटप करण्यात येईल याची नोंद घ्यावी, असे माजलगाव विधानसभा मतदार संघ निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांनी कळवले आहे.

## निवडणूक निरीक्षक लालटनपुई व्हाँगचाँग यांच्याकडून स्ट्राँग रूमची पाहणी

बीड दि. 31 गेवराईव माजलगाव विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक निरीक्षक (सर्वसाधारण) लालटनपुई व्हाँगचाँग यांनी काल (ता. ३०) माजलगाव विधानसभा मतदार संघाच्या स्ट्राँग रूमची पाहणी केली. तर आज गेवराई येथील स्ट्राँग रूमची पाहणी केली.



त्याचबरोबर मिरकाळा, रामू नाईक तांडा आणि हरलाल तांडा येथील मतदान केंद्रांचीही पाहणी केली. त्यांच्यासमवेत गेवराई विधानसभा मतदार संघ सहायक निवडणूक निर्णय अधिकारी संदीप खोमणे, माजलगावचे सहायक

## जिल्ह्यात मनाई आदेश लागू

दैनिक लोकआरंभ//

बीड, दि. 31 - : जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी महाराष्ट्र पोलीस कायदा 37 (1) (3) अन्वये मनाई आदेश जारी करण्यात आले असल्याचे अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे. दिनांक 31ऑक्टोबर 2024 रोजीचे 00.01 वाजेपासून ते 14 नोव्हेंबर 2024 रोजीचे 24 वाजेपर्यंत आदेश लागू असतील. बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा 37 (1) (3) अन्वये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका-यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत. अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय 15 दिवसांपेक्षा जास्त मुदतीपर्यंत अंमलात राहणार नाही, असेही आदेशात नमूद आहे.







# वेद व हिंदू धर्मग्रंथाचे ज्ञानी!

स्वामी दयानंद सरस्वती हे एका युगपुरूषाचे नाव आहे. एकोणीसाव्या शतकातली ती एक महान व्यक्ती नव्हे, शक्ती होती. ते एक महान धर्मसुधारक व समाजसुधारक होते. अंधारात सापडलेल्या व दिशा हरवून बसलेल्या समाजाला व देशाला आधार असतो तो केवळ समोरच्या क्षीतिजावर चमकणाऱ्या ध्रुवताऱ्याचा. स्वामी दयानंद सरस्वतींनी धर्मसुधारणेच्या कार्याची प्रेरणा बायो समाजाकडून घेतली होती. प्रारंभीच्या काळात त्यांच्या सहकार्यानेच धर्मप्रचाराचे व धर्मानुधारणेचे कार्य करीत. तथापि पुढे त्यांनी आपला वेगळा संप्रदाय निर्माण करण्याचे ठरविले. त्यानुसार त्यांनी मुंबई येथे दि.१० एप्रिल १८७५ रोजी आर्य समाजाची स्थापना केली. श्री एन. के. कुमार जी. गुरुजींचा सदर ज्ञानवर्धक लेख... संपादक.

आर्य समाजाने धार्मिक व सामाजिक सुधारणांबरोबरच शैक्षणिक सुधारणा केल्या. वेदांचे शिक्षण घेणारा तरुण हा निर्भय, तेजस्वी आणि काळाचे आव्हान स्वीकारणारा केव्हा होईल? असे स्वानी दयानंदाना वाटत होते. उत्तर भारतात त्यांनी चालविलेले चोक्षण प्रसाद कार्य अतिशय महत्वपूर्ण ठरले. समाजाच्या सर्व घटकाना एका सूत्रामध्ये बांधण्याकरिता समान भाषा आवश्यक आहे, अशी त्यांची धारणा होती. हिंदी भाषेला राष्ट्रभाषेचे स्थान मिळावे, असे त्यांचे स्पष्ट मत होते. स्वामीजींनी ख्रिस्ती आणि मुसलमान धर्मात गेलेल्या लोकांचे शुद्धीकरण करून त्यांना हिंदू केले. महर्षी दयानंदांचा जन्म गुजरातमधील टंकारा या गावी दि.१२ फेब्रुवारी १८२४ रोजी झाला. त्यांचे मूळनाव मूळशंकर अंबाशंकर तिवारी होते. त्यांचे आई-वडील औदिच्य ब्राह्मण होते. समाजात त्यांना सन्मानाचे स्थान होते. घरची आर्थिक परिस्थिती चांगली होती. घराण्यात ज्ञानाची परंपरा होती. मूळशंकर हा कुशाग्र बुद्धीचा संवेदनशील मुलगा होता. वयाच्या चौदाव्या वर्षी यजुर्वेद त्यांना पूर्ण कंठस्थ होता. तीन प्रसंग असे घडले की त्यामुळे त्यांचे मन अस्वस्थ झाले. पहिला प्रसंग शिवरात्रीच्या दिवशी घडला. शिवमंदिरात व्रत, उपवास करत असता रात्रीच्या सामसूम झालेल्या क्षणी शिवपिंडीवर उंदीर चढला. त्याचा कुठलाच प्रतिकार पिंडीकडून होत नव्हता. वडिलांकडून भगवान शिवाबद्दल बरेच ऐकले होते, तसे होताना दिसले नाही. दुसरे, बहिणीचा मृत्यू व तिसरा प्रसंग चुलत्याचा मृत्यू होय. या प्रसंगांनी खुप दु:ख झाले. मलाही असेच मरण येईल का? मृत्यू काय आहे? तेही जाणणे आवश्यक वाटून मूलशंकरने एके दिवशी गृहत्याग केला व ते पुन्हा कधी घरी परतले नाही. लग्नाच्या बेडीतही अडकले नाही.

एकदा शिवरात्री होती. वडील म्हणाले, “मूलशंकर, आज सर्वांनी उपवास करायचा. रात्रभर देवळात जागायचे आणि शंकराच्या पिंडीची पूजा करायची.” हे ऐकून मूलशंकरने उपवास केला. दिवस संपला, रात्र झाली. मूलशंकर आणि वडील शंकराच्या देवळात गेले. त्यांनी पूजा केली, पिंडीवर फुले वाहिले. तांदळाच्या अक्षता वाहिल्या. रात्रीचे बारा वाजले. वडिलांना झोप येऊ लागली, पण मूलशंकर जागे राहिले. आपला उपवास निष्फळ होईल, या भीतीने ते झोपले नाही. देवळातल्या बिळांतून उंदीर बाहेर आले आणि शंकराच्या पिंडीभोवती फिरू लागले. ते पिंडीवरच्या अक्षता खाऊ लागले. हे दृश्य पाहून जी मूर्ती उंदरापासून स्वतःचे रक्षण करू शकत नाही, ती भक्तांचे संकटापासून रक्षण कशी काय करू शकेल? मूर्तीत काहीही सामर्थ्य नसते; तेव्हा मूर्तिपूजेलाही काही अर्थ नाही. अशा तऱ्हेचे विचार त्यांच्या मनात येऊ लागले. त्या वेळेपासून त्यांच्या मनात धर्माविषयी जिज्ञासा जागृत झाली. परमेश्वराचे शाश्वत स्वरूप व धर्माचा खरा अर्थ जाणून घेण्याची ओढ त्यांना लागली. इ.स १८५७च्या असफलतेपासून तर काँग्रेसच्या स्थापनेपर्यंत भारतीयांच्या हृदयामध्ये स्वातंत्र्यप्रेम जागृत ठेवण्याचे कार्य ज्या ज्या महापुरुषांनी केले, त्यापैकी स्वामी दयानंद हे एक होते. भारतात ब्रिटिशांना हाकलण्याकरिता सशस्त्रक्रांती हा एकमेव मार्ग आहे, अशी त्यांची पक्की खात्री होती. आर्यसमाज आणि गुरुकुल यांमध्ये राष्ट्रभक्ताना सशस्त्र क्रांतीकरिता प्रेरणा आणि प्रशिक्षण मिळत असे. स्वामी श्रद्धानंद, लाला लजपतराय आणि लाला हरदयाल आदी ब्रिटिशांना भारतातून हाकलण्याकरिता उघडपणे लढणारे नेते आर्यसमाजीच होते.

एकदा टंकारा नगरामध्ये कॉलराची साथ आली. त्या साथीमध्ये मूलशंकरची चौदा वर्षांची बहीण मरण पावली. या घटनेनंतर तीन वर्षांनी मूलशंकरच्या आवडत्या काकांचाही कॉलरामुळे मृत्यू झाला. मूलशंकरला याचा जबरदस्त धक्का बसला, जणू काही त्यांचे जीवन सर्वस्वच हरवले! कौटुंबिक बंधनाचा त्याग करावा, अशी मूलशंकरच्या मनात इच्छा निर्माण झाली. जीवन काय आहे? मृत्यू काय आहे? या प्रश्नांची उत्तरे सुयोग्य महात्म्याकडून समजवून घ्यावीत, असे त्यांना वाटत होते. या ध्येय प्राप्तीकरिता वयाच्या २१व्या वर्षीच त्यांनी घरदार सोडले. त्यांच्या घरातील वडीलधाऱ्या मंडळींनी त्यांच्या लग्नाचा चालविलेला विचार, हे त्यांच्या निर्णयास निमित्त झाले होते. भौतिक सुखाचा आनंद लुटण्यापेक्षा स्वतःची आध्यात्मिक उन्नती करून घेणे, त्यांना अधिक महत्त्वाचे वाटले. त्यासाठी घरादाराचा त्याग करून गुरूचा शोध घेत फिरण्याचा निर्णय त्यांनी घेतला. गृहत्याग केल्यानंतर मूलशंकर अहमदाबाद, बड़ौदा, हरिद्वार, काशी, कानपूर या ठिकाणी गुरूच्या शोधार्थ जंगलातून व पहाडातूनसुद्धा प्रवास करीत राहिले, परंतु त्यांना योग्य गुरू मिळाला नाही. याच सुमारास त्याकाळचे प्रकांड पंडित आणि संन्यासी स्वामी पूर्णानंद यांची मूलशंकरशी भेट झाली. त्यांचे शिष्यत्व पत्करून मूळशंकरांनी संन्यास धर्माचा स्वीकार केला. संन्यास धर्माचा स्वीकार केल्यानंतर त्यांनी स्वामी दयानंद सरस्वती हे नाव धारण केले. पंधरा वर्षापर्यंत सर्वत्र भ्रमंती केल्यावर स्वामी पूर्ण शर्मा नामक साधूच्या म्हणण्यानुसार स्वामी दयानंद मथुरेस येऊन पोहोचले. त्या ठिकाणी त्यांनी स्वामी विरजानंद यांचे शिष्यत्व पत्करून त्यांच्याकडूनच वेद व इतर हिंदू धर्मग्रंथाचे ज्ञान घेतले. स्वामीजींना वेद सर्वश्रेष्ठ आणि पवित्र वाटत होते. मुख्य म्हणजे वेदांमध्ये मूर्तिपूजा नव्हती की उच्चनीच हा भाव नव्हता. वेदातील ज्ञान हे खरेखुरे ईश्वरीय ज्ञान आहे; पवित्र ज्ञान आहे. ते

# भाजपचा महायुतीत मास्टर प्लान, १४८ जागा घेऊनही १७ जागांवर धनुष्यबाण आणि घड्याळ चिन्हावर आपलेच उमेदवार



महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी आणि विरोधी अशा सर्व पक्षांच्या तुलनेत भाजप सर्वाधिक जागांवर निवडणूक लढवत आहे.

महाराष्ट्रात विधानसभेच्या एकूण 288 जागा आहेत. महायुतीत तीन मोठे घटक पक्षांसोबत काही लहान पक्षांचादेखील समावेश आहे. तर महाविकास आघाडीतही तसंच गणित आहे. असं असलं तरी काँग्रेस आणि ठाकरे गटापेक्षा जास्त जागांवर भाजप निवडणूक लढवत आहेत. महायुतीत भाजपची बार्गेनिंग पावर जास्त असल्याने भाजप आपल्या 148 उमेदवारांना कमळ चिन्हावर निवडून आणण्यासाठी प्रयत्न करत आहे. भाजपने 148 जणांना अधिकृत पक्षाकडून उमेदवारी दिली आहे. भाजप पक्ष एवढ्यावरच थांबला नाही तर पक्षाच्या तब्बल 17 नेत्यांना मित्र पक्षांमध्ये प्रवेश करायला सांगत त्यांना शिवसेनेच्या धनुष्यबाण आणि राष्ट्रवादीच्या घड्याळ चिन्हावर लढायला लावत आहे. आकडेवारीनुसार, महायुतीत भाजपनं 148, शिंदेंच्या शिवसेनेनं 80, अजित पवारांच्या राष्ट्रवादीनं 53, मित्रपक्षांनी 5 जागांवर उमेदवार जाहीर केले. आणि अस्पष्ट चित्र असलेल्या 2 जागा असं एकूण 288 जागांचं गणित आहे. तर 7 जागांवर महायुतीत मविआबरोबरच एकमेकांचेही उमेदवार उभे आहेत. मविआत काँग्रेसने 103, ठाकरेंच्या शिवसेनेनं 89, शरद पवारांच्या राष्ट्रवादीनं 87, मविआच्या मित्रपक्षांनी 6 जागा घोषित केल्या आहेत. 3 जागांवरचं चित्र स्पष्ट झालेलं नाही.

# परिचय पत्र

श्री पुरुषोत्तम रामकृष्ण हिंगणकर कालवाडी ता अकोट जीं अकोला, ह मु चिखली पुणे श्रमसाफल्य हौसिंग सोसायटी फ्लॅट 403, बी. बी 23, सेक्टर न 17-19 घरकुल चिखली पुणे 62. शिक्षण :- ( B A संस्कृत )

१) श्री काळेश्वर ग्राम संस्थे आसू सातारा श्री प्रकाशजी सकुंडे द्वारा स्वदेशी भारत पुरस्कार2021

२) झुंज दिव्यांग संस्था चिखली पुणे द्वारा, अपंग विवाह सोहळ्यात समाज सेवा सन्मान 2021 तृप्ती देसाई सावित्री ब्रिगेड पुणे यांचे हस्ते स्वीकार.

३) इंद्रायणी साहित्य सेवारत्न पुरस्कार 2021 पद्मभूषण श्री जयंत ओक मुंबई यांचे हस्ते

४) तेजभूषण बहुउद्देशीय संस्था तेजभूषण सन्मान 2021 डॉ खं र माळवे वर्ल्ड पार्लमेंट सदस्य अमेरिका हस्ते साहित्य संमेलन प्रसंगी आळंदी दे येथे.

५) नक्षत्राच देणं काव्य सन्मान 2021 काव्य सन्मान

६) कोविड योद्धा कार्य सन्मान 2020 - 2021 विश्व वारकरी सेना महाराष्ट्र राज्य

७) दैनिक राष्ट्र सह्याद्री द्वारा, राष्ट्र निर्माण सन्मान2021

८) पर्यावरण व पर्यटन बहुउद्देशीय संस्थेद्वारा आयोजित राळेगणं सिद्धी येथे पद्मभूषण समाज रत्न अन्ना हजारे यांचे हस्ते राष्ट्रीय पर्यावरण सन्मान पुरस्कार 2022

९) काव्यमित्र संस्था पुणेचा राष्ट्रीय समाज भूषण पुरस्कार 2022

१०) विश्वसंत नामदेव महाराज साहित्य रत्न पुरस्कार 2023 (शब्दवेधी बाणाक्षरी साहित्य समूह पुणे द्वारा प्राप्त )

११)आंतरराष्ट्रीय साहित्य कवी पुरस्कार उत्क्रांती हायस्कुल जरुड जी. अमरावती 2023.

१२) वारकरी साहित्य पुरस्कार 2023 (वारकरी साहित्य परिषद महाराष्ट्र राज्य.)

१३) राजयुवा प्रतिष्ठान पुणेचा कवी संमेलणाचे प्रमुख अतिथी पद भूषविले आणि राजयुवा साहित्य सेवा पुरस्कार 2024.

१४) कल्याण साहित्य संस्थेच्या कवी संमेलणाचे अध्यक्षपद भूषविले 2024.

१५)समीक्षा सेवाभावी संस्था इंदापूरच्या कवी संमेलणाचे 2024 चे अध्यक्ष पद भूषवले.

१६) अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद पुणेचा संत गाडगे महाराज साहित्य गौरव पुरस्कार 2024

१७)भावासुमन साहित्यकणा फौंडेशन च्या तीर्थ विठ्ठल यां पुस्तकाचे प्रकाशन श्री पुरुषोत्तम महाराज हिंगणकर यांचे हस्तेदि 20/10/2024 रोजी झाले.

१८) डॉक्टर मनीभाई पटेल माणव सेवा ट्रस्ट दिल्ली संचलित भारतरत्न सरदार वल्लभाई पटेल हिंदूरत्न पुरस्कार 2024 तसे बरेच ऑनलाईन काव्य सन्मान वाट्याला आले आहेत. पुस्तकं प्रकाशित 1) वासुदेव पासष्टी हिंदी संस्कृत मराठी काव्य ( श्लोक - स्तवन, अभंग ओवीबद्ध )अश्या त्रिवेणी सांगामातील पुस्तकं आहे. सर्वात मोठे एक आत्म निर्झर लिखाण चालूच आहे त्यात सर्व काव्याचे प्रकार वाचायला मिळतील. साहित्य,कला समाज सेवा, आणि पर्यावरण सेवा नदी संवर्धन स्वच्छता अभियान इत्यादी सर्व माझ्या अनेक समाज उपयोगी कार्याचा आढावा घेऊन काव्य मित्र यां संस्थेने पुणे माझी निवड करून राष्ट्रीय समाज भूषण पुरस्कार 2022 दिला आहे. माझ्या जीवनात अनेक सेवा करण्याची संधी मला प्राप्त झाल्या बद्दल ईश्वराचे मि सर्व प्रथम आभार मानेल. श्री संत गजानन महाराज संस्थांन शेगावचे अध्यक्ष शिवशंकरभाऊ पाटील यांचे स्मृती प्रित्यर्थ विश्व वारकरी सेना वं अखिल भारतीय वैष्णव कला साहित्य मंच पुणेच्या माध्यमातून महाराष्ट्र व देशभऱ्यात कोविड ने थैमान घातले तेव्हा सर्व महाराष्ट्रात ऑनलाईन मार्गदर्शन करून झाडाची लागवड केली तसेच ज्या जोग महाराज कृतं वारकरी शिक्षण संस्थेतून अध्यात्मिक आणि समाज सेवेचा वसा घेवून आम्ही कीर्तनकार प्रवचनकार




होऊन 1984-85 साली आम्ही बाहेर पडलो त्या नंतर अनेक गावो गावी कीर्तन प्रवचने करून त्याचे जीवनास सार्थकता मिळाल्याचे आज समाधान मिळतं आहे. 1987 ते 2005 पर्यंत ह भ प श्री जयराम महाराज भोसले यांचे समवेत सिद्धेबेट बचाव तपोवन हटाव यां नाऱ्यांसह सर्व सामान्य वारकऱ्यासाठी अनेक आंदोलने उपोषणे केली आणि ती जागा शासनाच्या ताब्यात दिली. इंद्रायणी स्वछतेसाठी इंद्रायणी सेवा फौंडेशन च्या माध्यमातून अनेक आंदोलने उपोषण करून शासनास स्वच्छ करण्यास भाग पाडले त्या साठी महाराष्ट्रभर दौरे करून,कविता, लेख, आणि प्रबोधनातुन कार्य केले. मराठा आंदोलनात आळंदी दे. चिखली येथे उपोषणात सहभाग तसेच 16 एप्रिल 2021 पासून नॉनस्टॉप साहित्य सेवा अखिल भारतीय वैष्णव कला साहित्य पुणेच्या माध्यमातून अविरतपणे अनेक देश विदेशासह अनेक कवीप्रोत्साहनपर सन्मान पत्र देऊन कवी लेखक घडविण्याचे कार्य करीत आहोत. जीवनात अनेक चढ उतार पाहत अनेक साहित्यिक घडविण्यात यशस्वी झालो आता पर्यंत अनेकं ऑनलाईन उपक्रम राबवून देश विदेशातील मराठी साहित्यिक घडविण्याचे कार्य ऑनलाईन अविरतपणे अव्याहत चालू आहे त्या बद्दल all सोशल मीडिया अग्रगण्य फेसबुक व्हाॅट्सअप, कुटुंब app, koo-app, शेअर चॅट, इंस्टाग्राम आदी माध्यमातून सर्वत्र पाहता कार्याचा आढावा आपणांस आल्याशिवाय राहणार नाही तसेच श्रमदान करून पर्यावरणाचे दृष्टीने झाडें लावणे नदी इंद्रायणी स्वच्छ करने त्या साठी जन जागृती इंद्रायणी सेवा फाउंडेशन च्या माध्यमातून काव्य स्पर्धा वक्तृत्व स्पर्धा, व स्वच्छता अभियान घेऊन उत्कृष्ठ कार्य करण्याची आणि कीर्तन प्रवचणाच्या माध्यमातून प्रबोधनाची अविरत सेवा ईश्वर कृपें आमचे हातून संत ज्ञानोबा तुकोबा माउलीं करून घेत आहेत त्याचे मनास समाधान प्राप्त झाले. त्याचं प्रमाणे काही संघटना संस्थेचा कार्यकारी सभासद . इंद्रायणी सेवा फाउंडेशन कार्याध्यक्ष यां माध्यमातून इंद्रायणी स्वछतेसाठी अनेक कार्यक्रम केले. साहित्य सेवेतून समाज प्रबोधन करीता अनेक अभंग आणि इतर अनेक कवितेची निर्मिती करून प्रबोधन केले तसेच झाडें लावण्याचे कार्यक्रम हाती घेऊन वारकरी शिक्षण संस्थेत जोग महाराज जयंती निमित्त 200 झाडें लावलेत आणि सिद्धबेट इथेही 700 झाडें लावण्यासाठी तरुणांना प्रेरित करून अनेक उपक्रम चालवले जेणे करून सिद्धबेट पाहून प्रत्येकाला आनंद वाटला पाहिजे असे आळंदी नगर परिषद मुख्य प्रशासन अधिकारी श्री कैलासजीं केंद्रे यांचे सहकार्याने नगर पालिके मार्फत अनेक उपक्रम राबविले आहेत.

1) संस्थापक अध्यक्ष :- अखिल भारतीय वैष्णव कला साहित्य मंच पुणे
2) कार्याध्यक्ष :- इंद्रायणी सेवा फाउंडेशन अलंकापूर पुणे
3) प्रदेशाध्यक्ष :- जय महाकाल भक्त सेना महाराष्ट्र
4) राष्ट्रीय प्रवक्ता प्रमुख :- विश्व वारकरी सेना महाराष्ट्र
5) पुणे जिल्हाध्यक्ष :- हिंदू रक्षक धर्मं परिषद संघटना महाराष्ट्र.
6) सदस्य :- राष्ट्रीय पर्यावरण वं पर्यटन बहुउद्देशीय संस्था भारत. ७) अध्यक्ष पश्चिम महाराष्ट्र, युवा क्रांती फाउंडेशन द्वारा संचलित (पोलीस मित्र,पत्रकार सुरक्षा, माहितीचा अधिकार संघटना.) इत्यादी संघटना व संस्थेच्या माध्यमातून अनेक कार्य करण्याची संधी प्राप्त होते ती मनाला खुप समाधान देते.

# माजलगाव मतदार संघातून महाविकास आघाडीचे उमेदवार मोहन जगताप यांचा विजय निश्चित.... शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते

वीधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माजलगाव विधानसभा महाविकास आघाडीचे उमेदवार मोहन दादा जगताप यांच्या प्रचारार्थ आज धारूर शहरातील हॉटेल श्रावणी पॅलेस येथे महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक संपन्न झाली. याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते बोलताना असे म्हणाले की केंद्रामध्ये काँग्रेसचे सरकार असताना शेतकऱ्यांच्या कापसाचा भाव दहा ते बारा हजार रुपयापर्यंत गेला होता आणि या निर्दयी सरकारच्या काळामध्ये कापसाचा भाव सात ते साडेसात हजार रुपयांवरती येऊन ठप्प झाला आहे. या सरकारने दुसऱ्या देशातून पिकांची आयात केल्याने पिकाला भाव मिळत नाही. शेतकरी बांधवांना देशोधडीला लावण्याचे काम या सरकारने केले आहे. आपल्या मूलभूत गरजांच्या मालावरती यामध्ये किराणा असेल वस्त्र असतील दैनंदिन आपल्या ज्या गरजा असतील त्याच्यावरती 18% जीएसटी लावण्याचे काम केंद्र सरकारने आणि राज्य सरकारने या राज्यांमध्ये आणि देशांमध्ये केलेले आहे. लोकशाही सर्वसामान्य लोकांसाठी काम करते लोकांचे मूलभूत अधिकार त्यांच्या गरजा आणि त्यांना सुविधा पुरविण्याचे सरकार म्हणून त्यांचं काम असतं परंतु या सरकारने हे न करता 18% आणि 28% प्रमाणे जीएसटी वसूल करून तिजोरी भरण्याचं काम केलं. सर्व जाती धर्मामध्ये भांडणे लावण्याचे काम फडणवीस शिंदे सरकारने केले. आरक्षणाच्या नावाखाली छोट्या-मोठ्या जातींमध्ये आरक्षणाच्या मुद्द्यावरून तेढ निर्माण करण्याचे काम या सरकारने केले आहे आणि आपल्या माजलगाव विधानसभेचे विद्यमान आमदार बघितले तर आमदारांना टक्केवारी सम्राट अशी पदवी दिली पाहिजे. आणि म्हणून माजलगाव विधानसभा मतदारसंघाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी शेतकरी, कष्टकरी, बेरोजगार बंधू भगिनींना सोबत घेऊन चालणाऱ्या महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर आणण्यासाठी येणाऱ्या २० तारखेला तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हासमोरील बटन दाबून सर्वांच्या सुखदुःखात मदतीला धावून येणारे महाविकास आघाडीचे उमेदवार मोहनदादा जगताप यांना प्रचंड बहुमताने विजयी करा असे आवाहन केले. वा माजलगाव मतदारसंघातील शिवसैनिक मोहनदादा यांना निवडून आणण्यासाठी अहोरात्र मेहनत घेतील.. महाराष्ट्राच्या विधानभवनावरती महाविकास आघाडीचा झेंडा फडकाविण्यासाठी कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे आसे आव्हान केले... यावेळी धारूर चे माजी नगराध्यक्ष अर्जुन दादा गायकवाड, माजलगाव चे माजी नगराध्यक्ष साहील भाई चाऊस, युवासेना जिल्हाप्रमुख अभिषेक दिवे, जिल्हा संघटक रतन तात्या गुजर, राष्ट्रवादीच्या जिल्हा संघटक नररीन बागवान ताई, शिवसेनेचे धारूर तालुका प्रमुख बाबा सराफ, माजी तालुका प्रमुख विनायकरावजी ढगे, युवा सेना तालुकाप्रमुख रोहित फावडे, युवा सेना शहर प्रमुख रोहित फावडे, सोशल मीडिया तालुका प्रमुख बलभीम मुंडे, विनोद गूंड पाटील, अजय गायकवाड, अमोल सिरसट, सुनील कोमटकर, अशोक आंधळे, शाम फावडे, दत्ता फावडे, वैभव कटाळे, शिवराज भोसले, बबलू जाधव, बाबा शेख, बळी वराडे, अंकुश कदम, शुभम शिंदे सह महाविकास आघाडी व सर्व मित्र पक्षाचे आजी माजी पदाधिकारी व मतदार बंधू उपस्थित होते...!!

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार १ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com


# ऐन दिवाळीत प्रकाश सोळंकेच्या गडाला मोहनराव जगतापांनी लावला सुरुंग

## छत्र बोरगाव,कोथरुळ येथील सोसायटी चेअरमन,माजी सरपंच, ग्रामपंचायत सदस्यांसह गावकऱ्यांचा गणेश रांजवण यांच्या पुढाकाराने जाहीर प्रवेश

माजलगाव : ऐन दिवाळी सणात माजलगाव विधानसभेचे वातावरण चांगलेच तापले आहे. उमेदवारीवरून सुरु झालेल्या काका पुतण्यातील वादातुन कसेबसे आ.प्रकाश सोळंके सावरत असतानाच त्यांचे मुख्य विरोधक तुतारी चे उमेदवार मोहनराव जगताप यांनी त्यांच्या एका एका गडास सुरुंग लावण्यास सुरुवात केली आहे.आज बोरगाव कोथरूळ येथील सोसायटी चेअरमन सह ग्रामपंचायत सदस्यांनी मोहनराव जगताप यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत राष्ट्रवादी शरद पवार या पक्षात प्रवेश केला. छत्र बोरगाव,कोथरुळ येथील सोसायटी चेअरमन, ग्रामपंचायत सदस्यांसह गावकऱ्यांचा जाहीर प्रवेश गणेश रांजवण यांच्या पुढाकाराने आज मोहनराव जगताप यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत पक्ष प्रवेश केला.

छत्र बोरगाव सेवा सह. सोसायटी चेअरमन अरुणराव जाधव,मा. उपसरपंच परमेश्वर जाधव,भागवतराव जाधव,माजी सरपंच सुदामराव कदम,लक्ष्मणराव जाधव,गणेश जाधव, प्रसाद जाधव,अक्षय जाधव,मोहन जाधव,सिद्धेश्वर जाधव, गणेश जाधव, गणेश बेद्रे, दादा तौर, कृष्णा जाधव,प्रकाश बेद्रे, अशोक घुंगासे,गोरख जाधव तसेच कोथरूळ येथील ग्रामपंचायत सदस्य शत्रुघ्न कदम,गोविंदराव कदम,मुंजाभाऊ वाघे,वसंतराव कदम यांच्यासह अनेकांनी आज मोहनराव जगताप यांच्या राष्ट्रवादी पक्षात प्रवेश केला.





यावेळी राष्ट्रवादचे पदाधिकारी विश्वंभर थावरे, श्रीहरी काळे, संतोष आबा यादव,श्रीकृष्ण सोळंके,कचरू तात्या खळगे, कमलाकर कदम, कल्याण जाधव, अब्बासभाई, प्रकाश चव्हाण, सरपंच भालचंद्र सोळंके, अंगद कटके, फिरोज इनामदार, ईश्वर होके, शरद यादव यांच्यासह अनेक कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

# पवार कुटुंबीय दिवाळीला एकत्र दिसतील का? अजित दादा म्हणाले:.

दिवाळी म्हटलं की, बारामतीत पवार कुटुंबीय एकत्रित येण्याचा क्षण असतो. मात्र आधी लोकसभा आणि आता विधानसभेत पवार कुटुंबियांत राजकीय कटुता निर्माण झालीय. त्यामुळे आता या दिवाळीत पवार कुटुंबीय एकत्रित येतील का? याकडे सर्वांचं लक्ष लागून आहे. अशातच अजित पवारांना याबाबत विचारलं असता आपल्याला दिसेलचं, असं म्हणत त्यांनी स्पष्टपणे बोलणं टाळलं. तर सुप्रिया सुळे असं म्हणताच भाऊबीजबद्दल पत्रकार विचारतील हे हेरून अजित पवारांनी काढता पाय घेतला. पुरंदरमध्ये अजित पवारांनी उमेदवार दिल्याने शिवसेनेच्या विजय शिवतारेंनी टीका केली. याबाबत अजित पवार यांना प्रश्न विचारण्यात आला असता, मला महायुतीत एकोपा ठेवायचा आहे. त्यांच्यावर इतर नेते उत्तर देतील, असं अजित पवार म्हणाले. चिंचवडमधील तिढा सोडविण्याच्या दृष्टीने अजित पवारांनी नाना काटे यांची भेट घेतली. मात्र काटे माघार घेणार का? यावर ही 4 तारखेला चित्र स्पष्ट होईल, असं अजित पवार म्हणाले. दुसरीकडे मावळ विधानसभेत सुनील शेळकेंचा प्रचार करायला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपचे इतर नेते येतील, असा दावाही अजित पवारांनी केला. मावळ पॅटर्न अडचणीचा ठरेल का? असं विचारलं असता, थोड्या दिवसांत तोडगा निघेल, असा विश्वास ही त्यांनी व्यक्त केला.

अजित पवार आणखी काय-काय म्हणाले?"चिंचवडची जागा महायुतीत भाजपला गेली आहे. नाना काटे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केलाय, म्हणून भेटायला आलो आहे. कार्यकर्त्यांच्या भावना तीव्र आहेत. मी सांगेल तोच निर्णय घ्यावा लागेल, असं मी त्यांना सांगितलं आहे. मावळमध्येही तिढा निर्माण झालाय.

# आव्हान शिबिरासाठी सिद्धेश्वर महाविद्यालयाच्या रोहित पवार याची निवड

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती या ठिकाणी होणाऱ्या आव्हान राज्यस्तरीय आपत्कालीन व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरासाठी येथील श्री सिद्धेश्वर महाविद्यालयाच्या चि. रोहित राजेभाऊ पवार याची डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या संघात निवड झाली आहे. सदरील शिबिर हे 07 नोव्हेंबर ते 16 नोव्हेंबर या दरम्यान अमरावती येथे होणार आहे. या निवडीचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या संचालिका डॉ. सोनाली क्षीरसागर, संस्थेचे केंद्रीय अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलुरकर, केंद्रीय कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा चंद्रकांत मुळे, स्थानिक व्यवस्था मंडळाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी, कार्यवाह ऍड विश्वास जोशी, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड, केंद्रीय कार्यकारणी सदस्य अमरनाथ खुर्पे, प्रकाश दुगड, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे , उपप्राचार्य डॉ. युवराज मुळे डॉ. गजानन होना, एनएसएस चे कार्यक्रमाधिकारी डॉ. विकास बोरगावकर डॉ. सुनील पाटील डॉ. ज्ञानेश्वर गवते, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी यांनी स्वागत करून चि. रोहित पवार चे अभिनंदन केले.

# रवी राजा यांनी काँग्रेस सोडत भाजपमध्ये प्रवेश का केला? वर्षा गायकवाड यांनी नेमकं कारण सांगितलं



विधानसभा निवडणूक काळात मुंबईत बऱ्याच राजकीय घडामोडी घडत आहेत. माजी नगरसेवक, मुंबई महापालिकेत विरोधी पक्षनेते राहिलेले रवी राजा यांनी काँग्रेस पक्ष सोडला. आज सकाळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. त्यांच्या पक्ष प्रवेशावर मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा, खासदार वर्षा गायकवाड यांनी टीव्ही 9 मराठीला प्रतिक्रिया दिली आहे. रवी राजा यांच्याशी आमच्या कुटुंबाचे चांगले संबंध आहेत. पण इतकी वर्ष काँग्रेसमध्ये राहून ते का गेले माहीत नाही. काँग्रेसने त्यांना सगळं काही दिलं. महापालिकेत विरोधी पक्षनेते पद दिलं. इतर महत्वाची पदं दिली. पण तरी देखील ते भाजपमध्ये गेले हे दुर्भाग्यपूर्ण आहे, असं वर्षा गायकवाड म्हणाल्या आहेत.

# श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात राष्ट्रीय एकता दिन साजरा

स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्री व उपपंतप्रधान वल्लभभाई पटेल यांची जयंती राष्ट्रीय एकता दिन म्हणून सिद्धेश्वर महाविद्यालयात उत्साहाने साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख अतिथी डॉ. सुनील पाटील यांनी सरदार पटेल यांच्या जीवनावर प्रकाश टाकला आपल्या मार्गदर्शनपर भाषणात ते म्हणाले की वल्लभभाई पटेल यांनी देशाच्या स्वातंत्र्य लढ्यासाठी व स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताच्या राजकीय एकसंघीकरणात मोठे योगदान दिले. मुत्सद्देगिरी व वेळ पडल्यास सैन्यबळ वापरून सरदार पटेलांनी संस्थाने भारतात विलीन केली आणि म्हणूनच ते भारताचे लोहपुरुष म्हणून ओळखले जातात असे



गौरवोद्गार कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य डॉ. युवराज मुळये यांनी काढले. यानंतर डॉ. युवराज मुळये यांनी राष्ट्रीय एकता दिवसाची शपथ दिली. याप्रसंगी एनएसएसचे सर्व स्वयंसेवक, कार्यक्रमाधिकारी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# बीड विधानसभेची जागा मला कसल्याही परिस्थितीत जिंकायचीय आहे-धनंजय मुंडे

बीड (प्रतिनिधी) दि.३१ : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची महायुतीतील बीडची जागा आपण मिळविली आहे. त्यामुळे आता सर्व मित्र पक्षांना सोबत घेऊन ताकदीने कामाला लागा. सर्वसामान्य मतदारांपर्यंत पोहचण्याची रणनीती आखावी. 'मला कसल्याही परिस्थितीत बीडची जागा जिंकायचीय', अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते तथा पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांनी महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांना बळ दिले. महायुतीकडून बीड विधानसभेसाठी उमेदवारी जाहीर झाल्याबद्दल व अधिकृत उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांची डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासह सहकाऱ्यांनी परळी येथे कार्यालयात बुधवारी (दि.३०) भेट घेऊन आभार व्यक्त केले. तसेच, गोपीनाथ गड येथे लोकनेते स्व.गोपीनाथजी मुंडे साहेबांच्या समाधीचे दर्शन घेतले. यावेळी सर्व पदाधिकाऱ्यांसमोर ना.धनंजय मुंडे यांनी 'जिथे कमी तिथे आपण उभा राहील' असाच विश्वास दिला. सर्व अडचणींवर मात करण्यासाठी मी पावलोपावली सोबत आहे, अशा शब्दात त्यांनी डॉ.योगेश क्षीरसागर यांना लढण्यासाठी आणि जिंकण्यासाठीच बळ दिले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी,



कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, प्रवासादरम्यान केजमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या संपर्क कार्यालयात तालुकाध्यक्ष विष्णू चाटे यांच्या नेतृत्वाखाली युवक कार्यकर्त्यांनी सत्कार केला.

## पक्षश्रेष्ठीसह मुंडे बहिण-भावाचे मानले आभार

पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष ना.अजितदादा पवार, कार्याध्यक्ष खा.प्रफुल्ल पटेल, खा.सुनील तटकरे यांच्यासह महायुतीच्या सर्व नेत्यांचे डॉ. योगेश क्षीरसागर यांनी आभार व्यक्त केले. तसेच, धनुभाऊ व पंकजाताई यांनी आशिर्वाद व मार्गदर्शन भक्कमपणे कायम पाठीशी राहू द्यावे, अशा शब्दात डॉ.योगेश क्षीरसागर यांनी प्रत्यक्ष भेटीदरम्यान आभार मानले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार १ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# फक्त एका वाक्यात मनोज़ जरांगे यांचा निकाल: छगन भुजबळ नेमक काय म्हणाले?


निवडणूकीत प्रचारात शरद पवार यांनी अजितदादा यांच्यावर टीका करताना त्यांची नक्कल केली होती. यावर राष्ट्रवादीचे मंत्री छगन भुजबळ यांनी आपली प्रतिक्रीया व्यक्ती केली आहे. निवडणूका आल्या की प्रचाराची भाषणं इमोशनल, नक्कल करणारी आणि टर उडविणारी असतातच ती सर्व पाहून घेऊनच पुढे जायचे असते असे या संदर्भात छगन भुजबळ यांनी म्हटले आहे. आर.आर. पाटील यांच्यावर अजितदादा यांनी टीका केली आहे. या संदर्भात विचारले असता छगन भुजबळ यांनी आता ते हयात नाहीत त्यामुळे त्यांच्यावर बोलता



येणार नाही.परंतू अजितदादांच्या आधी दोन वर्षांपूर्वी मी देखील ही गोष्ट शरद पवार यांच्या कानावर घातली होती अशी प्रतिक्रिया मंत्री छगन भुजबळ यांनी दिली आहे. महायुतीत जागावाटपावरुन वाद सुरु आहेत. यावर बोलताना मंत्री छगन भुजबळ म्हणाले की पूर्वी काँग्रेस होती, नंतर शिवसेना उदयाला आली. 95 ला काँग्रेसच्या विरोधात शिवसेना – भाजपा लढले. काँग्रेसचे दोन पक्ष झाले.आता तर शिवसेनेचे दोन आणि आमचे दोन पक्ष झाले. काँग्रेस वेगळी झाली. आता सहा पक्ष झाले आहेत. वंचित आघाडी देखील आहे. प्रत्येक जण तिकीट मिळेल म्हणून काम करत असतात. अपेक्षा भंग झाला तर इकडून तिकडे जातात, सगळीकडे झाले आहे. उमेदवार वाढत आहेत. अपक्ष वाढत आहेत असे भुजबळ यांनी सांगितले.

## यंदा जरांगे फॅक्टर ?

महायुतीत देखील एकाच ठिकाणी दोन उमेदवार आहेत, याबाबत छगन भुजबळ म्हणाले की आता बघुया काय होते ते, काही लोकांचे काम असे आहे की कामावरच ते निवडून येतात. 5 वर्षे काम केले असेल तर निवडणुकीच्या वेळेला जायची गरज नाही असेही भुजबळ यांनी सांगितले. जरांगे यांनी उमेदवार उभे करण्याची घोषणा केली होती. या संदर्भात मंत्री छगन भुजबळ यांना विचारले असता ते म्हणाले की यंदा काही जरांगे फॅक्टर दिसत नाही असे शब्दात त्यांनी उत्तर दिले आहे.



## शेतकऱ्याची दिवाळी..!

आता दिवाळी तोंडावर आली
साऱ्यांची खरेदीही सुरू झाली
मी आता विचारंच करत होतो
तेवढ्यात मुलंही धावंत आली..
मुलगी म्हणे मला बाबा बाबा
कपडे बघा माझी कशी झाली
मला अजून फटाकेही नाही
आपली खरेदीही राहूनंच गेली..
आली तेवढ्यांत कारभारीन
तिनेही सामानाची यादीचं दिली
सोबत देत गळ्यातंले मंगळसूत्र
म्हणे याला विकायची वेळ आली.
मी हात जोडून देवाला म्हणालो
देवा ही वेळ माझ्यावर का आली
तू उभ्या पिकाची नुकसान केली
त्यात माझी स्वप्नही जागीच मेली.
आता कशी करू मी दिवाळी
माझी दिवाळी तू अंधारात नेली
तुला आली नाही का माझी दया
तू गरीबाची थट्टा का बरं केली ...
मला म्हणतात जगाचा अन्नदाता
पण रात्र तर उपासमारीतंच गेली
आता लेकरांना सांगू मी काय
त्यांच्या बापाने काय चूक केली..

कवी- निवृत्ती एकनाथ पाचपोर.
मु.पो. तिवडी ता. जळगाव (जामोद)
जि.बुलढाणा८८०५१७८८५८. ??*




सुभेच्छुक . बळिराम बबनराव गवते

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com